# मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज क्र. १६ सन २०२१ मधे नि. ८ वरील आदेश

| | | |
|---|---|---|
| भास्कर राजाराम नारकर वगैरे २ | | अर्जदार |
| *विरुद्ध* | | |
| मिथीला विश्वनाथ रेडीज वगैरे ३ | | सामनेवाला |

१. दिनांक १५/०८/२०१९ रोजी झालेल्या मोटार वाहन अपघातामध्ये प्रविण भास्कर नारकर वय वर्षे ३५ यांचा अपघाती मृत्यू झाल्यामुळे, अर्जदार १ व २ हे त्यांचे आई वडील व सामनेवाला क्र. ३ हि पत्नी असे वारस असल्यामुळे त्यांनी मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाची थोडक्यात हकीगत अशी की,

दिनांक १५/०८/२०२१ रोजी अर्जदार यांचा मुलगा व सामनेवाला क्र. ३ चा पती प्रविण भास्कर नारकर हा पाचल कडुन त्यांच्या स्प्लेंडर प्लस मोटार सायकल क्र. एम.एच.०८-पी-७४५६ ने जात असताना त्यादिवशी समोरुन सामनेवाला क्र. २ हा आपल्या ताब्यातील टाटा सुमो व्हीक्टा क्र. एम.एच.-०१-एएच-१७३६ ही गाडी कोल्हापूर ते पाचल अशी चालवित घेवुन येत असताना पाचल उचावले, जंगलदेव येथे आलेवेळी सदरची कार ही सामनेवाला क्र. २ याने हयगयीने, अविचाराने, अतिवेगात चालवून समोरुन येणा-या प्रविण भास्कर नारकर याला जोरात धडक दिली या धडकेमुळे प्रविण हा रस्त्यावर खाली पडला व त्याचे डोक्याला गंभीर दुखापत झाली व त्या दुखापतीने प्रविण यांचा जागीच मृत्यू झाला. टाटा सुमो व्हीक्टा क्र. एम.एच.-०१-एएच-१७३६ चा चालक सामनेवाला क्र. २ याने सदरहू वाहन अतिवेगाने, निष्काळजीपणे, रस्त्यावरील

परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन, बेदरकारपणे चालविल्यामुळे सदरचा अपघात घडल्याचे अर्जदार यांनी नमूद केलेले आहे.

३. अपघाताची प्रथम खबर बबन विश्राम जाधव यांनी दिलेली दिसून येते. त्यांन दिलेल्या खबरीआधारे टाटा सुमो व्हीक्टा चालक सामनेवाला क्र. २ याने त्याचे ताब्यातील टाटा सुमो व्हीक्टा क्र. एम.एच.-०१-एएच-१७३६ ही गाडी अतिवेगाने, निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालवून अपघात घडल्यामुळे सामनेवाला क्र. २ हे मृतक प्रविण यांचे मृत्यूस कारणीभूत झाल्यामुळे त्यांचे विरूद्ध भा.द.वि. कलम ३०४-अ, २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियमाचे कलम १८४, १४६ व १९६ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. सामनेवाला १ व २ यांनी नि. २० येथे आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे म्हणणे प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज हा योग्य व कायदेशीर नाही तसेच अप्रामाणिक हेतूचा आहे. सदरची टाटा सुमो व्हीक्टा क्र. एम.एच.-०१-एएच-१७३६ ही गाडी सामनेवाली क्र. १ हिने अनंत विश्वनाथ पाध्ये यांचेकडून लिलावामध्ये खरेदी केली होती. परंतु त्यांनी इतर विकलेल्या गाडयांच्या व्यवहारामुळे सामनेवाला क्र. १ ला विकलेली गाडी नावावर करुन दिलेली नाही, त्यामुळे सामनेवाला क्र. १ हे गाडीचा इन्शुअरन्स् करु शकले नाहीत. त्याकरीता अनंत विश्वनाथ पाध्ये हे जबाबदार असून ते प्रस्तुत कामामध्ये आवश्यक पक्षकार आहेत. सबब प्रस्तुत अर्ज खर्चासह फेटाण्यात यावा अशी विनंती केली.

४. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांनी अर्जासोबत प्रथम खबरी अहवालाची, घटनास्थळ पंचनाम्याची, मरणोत्तर पंचनाम्याची, पोस्टमार्टेम रिपोर्टची, मृत्युचे कारणाच्या दाखल्याची, टाटा सुमो व्हीक्टा क्र. एम.एच.-०१-एएच-१७३६ या गाडीचे क्लीअरन्स सर्टीफिकेट, मृत्युप्रमाणपत्र या

कागदांच्या सत्यप्रती तसेच मयत प्रविण भास्कर नारकर यांचे लायसन्स, अर्जदार क्रमांक १ व २ तसेच सामनेवाला क्र. ३ चे आधारकार्ड यांच्या फोटोप्रति इत्यादी कागदपत्रे जोडलेली आहेत.

५. सदर कागदपत्रांमधील टाटा सुमो व्हीक्टा क्र. एम.एच.-०१-एएच-१७३६ या गाडीचे क्लीअरन्स सर्टीफिकेट या कागदाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचे वाहन हे सामनेवाला क्र. १ यांनी विकत घेतल्याचे दिसून येत आहे. सामनेवाला क्र. १ व २ यांनी दिलेले म्हणणे व त्यामधील विधाने मूळ अर्जाचा निर्णय देतेवेळी विचारात घेणेत येतील.

६. सबब, उपरोक्त कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, अर्जदार व सा.वाला क्र. ३ यांनी अंतरिम नुकसानभरपाई मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज प्रथमदर्शनी योग्यरित्या दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्जदार व सामनेवाला क्र. ३ यांना नुकसानभरपाईची अंतरिम रक्कम रु. ५०,०००/- देण्याची संयुक्तरित्या किंवा वैयक्तिकरित्या जबाबदारी सामनेवाला क्र. १ व २ यांचेवर आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ व २ आणि सामनेवाला क्र. ३ यांचा अंतरिम नुकसानभरपाई मिळण्याचा अर्ज मंजूर करणे न्याय्य व योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज (नि. ८) मंजूर करणेत येत आहे.

२. सामनेवाले क्र. १ व २ यांनी संयुक्तरित्या किंवा वैयक्तिकरित्या या न्यायाधिकरणात अंतरिम नुकसानभरपाई रक्कम रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) या आदेशाचे तारखेपासून एक महिन्याचे आत RTGS/NEFT किंवा चेक द्वारे जमा करावी. सामनेवाले क्र. १ व

२ यांनी सदर रक्कम एक महिन्याचे आत जमा न केल्यास ती रक्कम अर्ज दाखल तारखेपासून द.सा.द.शे. ९ टक्के दराने व्याजासहीत जमा करावी.

३. सामनेवाला क्र. १ व २ यांनी सदरची रक्कम जमा केल्यानंतर अर्जदार क्र. १ व २ तसेच सामनेवाला क्र. ३ यांना समप्रमाणात हस्तांतरीत करणेत यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VINAYAK RAJARAM JOSHI
Date: 2023.01.25 17:30:57 +0530

रत्नागिरी (व्ही. आर्. जोशी)

दिनांक :- २४/०१/२०२३ अध्यक्ष,

मोटार अपघात वाद न्यायाधिकरण, रत्नागिरी

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| M.A.C.P. No. | :- | 16/2021. |
| Name of Stenographer | :- | V. B. Joshi. |
| Court Name | :- | MACT, Ratnagiri. |
| Date of Decision | :- | 24.01.2023 |
| Order signed by P.O. on | :- | 25.01.2023 |
| Order Digitally signed on | :- | 25.01.2023 |
| Order uploaded on | :- | 25.01.2023 |